संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# महाराष्ट्राचा मंगल कलश ते मानभंग.....

भारताच्या नव्हे तर जगाच्या इतिहासामध्ये आपले वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण करण्याचा मान महाराष्ट्राला मिळाला. परंतु आता हा देखील इतिहास ठरत असून वर्तमान किंवा भविष्यकाळात हे स्थान महाराष्ट्र गमवेल की काय असे वाटू लागले आहे. आज राज्याचा ५५ वा वर्धापनदिन साजरा करीत असताना महाराष्ट्राच्या सर्वांगिण विकासाला गेलेला तडा ठळकपणे नजरेसमोर येतो. लोकसभा निवडणुकीच्या धामधुमीतसुध्दा शेजारच्या गुजरातशी महाराष्ट्राची तुलना होत होती. अनेक विकासाच्या योजनांबाबत गुजरातने महाराष्ट्राला कसे मागे टाकले आहे हे सांगितले जाते. एकेकाळी सगळया राज्यांमध्ये महाराष्ट्र हे प्रगतीशील राज्य म्हणून गणले जायचे. एवढेच नव्हे तर सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रातही देशभर महाराष्ट्राचा गौरव होत असे. तसे पाहिले तर आजही महाराष्ट्राचा दबदबा दिसून येतो.

परंतु ज्यावेळेला राज्यातील सामान्य जनतेच्या सामान्य गरजांचा आणि राज्याच्या समतोल विकासाचा प्रश्न निर्माण होतो त्यावेळेला महाराष्ट्राच्या राज्यकर्त्यांनी आपले कौशल्य पणाला लावले नाही आणि अनेक प्रकारची संधी असूनही त्याचे सोने केले नाही. प्रामुख्याने गेल्या २५ वर्षांमध्ये राज्याच्या एकूणच विकासाला ग्रहण लागले. सर्वच प्रश्नाबाबत राजकारण होऊ लागले. सामान्य जनतेचे हित डोळयासमोर ठेवून सर्व क्षेत्रांना समान संधी दिली गेली नाही. पश्चिम महाराष्ट्रावर सत्ताधाऱ्यांनी नेहमीच कृपादृष्टी दाखविली. नैसर्गिक साधनांनी हा भाग संपन्न असल्यामुळे कृष्णा, गोदावरी, पंचगंगा, भीमा या नद्यांच्या पाण्याचा पुरेपूर उपयोग केला गेला. परंतु तितकाच पाणीसाठा असलेल्या तापीकडे दुर्लक्ष झाले. मराठवाडयाला वंचित ठेवले गेले. आज ५४ वर्षांनंतर पाण्यासारखी मूलभूत गरज पूर्ण होऊ शकलेली नाही. दरवर्षी निम्मा महाराष्ट्र दुष्काळाच्या छायेत असतो तर ७० टक्के महाराष्ट्र अपुऱ्या आणि अस्वच्छ पाण्याने हळहळत असतो. ही जर राज्याच्या विकासाची दिशा असेल तर महाराष्ट्र आपल्याच कर्माने आपल्याच नावलौकिकाला बट्टा लावित आहे.

## संकुचित दृष्टिकोन

ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदासांनी महाराष्ट्राच्या शौर्याचे कर्तृवाचे मराठी भाषेच्या सांस्कृतिक वैभवाचे इतके अभ्यासपूर्ण वर्णन केलेले आहे की, एकेकाळी हा महाराष्ट्र खरोखरच संपन्न असल्याची साक्ष पटते अन्यथा ज्ञानेश्वरांना मराठी भाषेबाबत अमृताते पैजा जिंके असे म्हणण्याची गरज पडली नसती किंवा समर्थ रामदासांना शिवाजी महाराजांचा पराक्रम पाहून त्यांना श्रीमंतयोगी किंवा जाणता राजा म्हणावे लागले नसते याचा अर्थच महाराष्ट्राची सर्वार्थाने एक स्वतंत्र ओळख होती. ज्यांचा सगळया देशभर आदराने उल्लेख केला जात असे. एक तर निसर्गानेसुध्दा महाराष्ट्रावर फार मोठी कृपादृष्टी केली. पराक्रमाची भरदार छाती शोभावी असा विशाल सह्याद्री आणि समृध्दीचे दान सतत वाहते ठेवणाऱ्या नद्या पाहिल्या की महाराष्ट्र हे दैवी देणगीचेच उदाहरण वाटू लागते. अगदी १८५०चा इतिहास जरी उलगडून पाहिला तरी देशातील अनेक मोठमोठ्या उद्योजकांनी महाराष्ट्रात येऊन जाणिवपूर्वक उद्योग सुरू केल्याचे दिसून येते. टाटा, बिर्ला यांच्या पासून ते अलीकडच्या अंबानी महिंद्रापर्यंत हा प्रवास चालू राहिलेला दिसून येतो.

मात्र गेल्या दशकापासून याच औद्योगिक विकासाला उतरती कळा लागली. कारण ८० च्या दशकामध्ये जगभरात नावलौकिक असलेला मुंबईचा कापड उद्योग बंद पडला आणि नंतर राज्याच्या औद्योगिक धोरणाची घडीच विस्कटली. मुंबईतले अनेक उद्योग महाराष्ट्राबाहेर गेले आणि ग्रामीण भागात उद्योग उभे राहावेत असा प्रयत्नच राजकर्त्यांनी केला नाही याचे सर्वांत मोठे कारण कोणते असेल ते म्हणजे जलसिंचनाकडे अक्षम्य दुर्लक्ष केले. भ्रष्टाचार शिगेला पोहोचला. ७० हजार कोटीचा खर्च दाखवूनही ७ हेक्टर जमीनही ओलिताखाली आली नाही आणि औद्योगिक विकासाची प्राथमिक गरज असलेले पाणी कारखानदारीला मिळाले नाही ही शोकांतिका असल्यामुळेच विकासाच्या नकाशावर अग्रेसर असलेला महाराष्ट्र केवळ राज्यकर्त्यांच्या संकुचित दृष्टिकोनामुळे पिछाडीवर गेला.

## वर्धिष्णू इतिहासही पराक्रमी हवा

१९६० साली ज्या महाराष्ट्राचा मंगलकलश आणला गेला ते मांगल्य टिकविण्यात राज्यकर्त्यांना यश आले नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी हे राज्य व्हावे ही तो श्रींची इच्छा असे म्हणून पराक्रमी स्वराज्याचे तोरण बांधले होते. त्याचे देखील भान राज्यकर्त्यांनी ठेवले नाही. खरे तर सगळया जगाच्या नकाशावर आपली छाप उमटविणारा महाराजांचा महाराष्ट्र कायम महान राहील अशी जिद्द दाखवण्याची गरज होती. परंतु दिल्लीश्वरांपुढे गुडगे टेकण्यात आणि त्यांनी दिलेल्या पदाच्या तुकडयावर समाधान मानण्याच्या वृत्तीने सामान्य मराठी माणसाचा विश्वासघात झाला. ज्यावेळेला आज शेजारचा गुजरात महाराष्ट्राला वाकुल्या दाखवितो त्यावेळेला महाराष्ट्राने आपलाच मानभंग करून घेतलेला आहे हे जाणविल्याशिवाय राहत नाही.

१९६० चा मंगल कलश ते आजचा मानभंग हा प्रवास नीट तपासला तर कौशल्य आणि आधुनिक दृष्टिकोन जिद्द आणि पराक्रम या आघाडयांवर राज्यकर्ते नापास झालेले दिसून येतात. या राज्याच्या निर्मितीचा इतिहाससुध्दा पराक्रमाचे पोवाडे गातो त्या महाराष्ट्राचा वर्धिष्णू इतिहासही पराक्रमीच राहिलाच पाहिजे यात काही शंका उरत नाही. आज ६२ वा वर्धापनदिन साजरा करताना विकासाचे ध्येय वर्धमान झाले पाहिजे. सामान्य जनतेला हा महाराष्ट्र माझा आहे आणि मी महाराष्ट्राचा आहे याचा सार्थ अभिमान वाटला पाहिजे. माझ्याच राज्यात माझ्यावर अन्याय होता कामा नये. ही त्याची साधारण अपेक्षा आहे. ती कायम राहिली पाहिजे. राजकारणाबरोबर महाराष्ट्राचे समाजकारणही तितकेच प्रगल्भ आहे. त्याचा देखील तितकाच सन्मान झाला पाहिजे. अशा काही माफक आणि मोजक्या इच्छा मनामध्ये बाळगून आम्ही महाराष्ट्र दिनानिमित्त या राज्यातल्या तमाम जनतेला हार्दिक शुभेच्छा देत आहोत.